अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ५ ऑक्टोबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


Lubi Pumps
प्रेशर पम्प, सेल्फ प्रायमिंग पम्प
गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर
94235 90463 / 94235 88463

## आता अहमदनगर नव्हे तर 'अहिल्यानगर'!

**अहिल्यानगर :** अहमद नगर जिल्हा आता 'अहिल्यानगर' या नावाने ओळखला जाणार आहे. अहमदनगर जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी मंजुरी दिली आहे. यासंदर्भात राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी माहिती दिली आहे.

अहमदनगरच्या नामांतराची मागणीही अनेक वर्षांपासून होत होती. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात सत्ताधारी नेत्यांनी यासंदर्भात वक्तव्येही केली होती. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाने नामांतराची मागणी मान्य करून व विधानसभेत तसा ठराव पारित केला होता. त्यानंतर राज्य सरकारने अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला होता. तो आता मंजूर झाला आहे. या निर्णयामुळे अहमदनगर जिल्ह्यातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# पवार काकांचा पश्चिम महाराष्ट्रात पॉवरबाज 'करिष्मा'
# तीन सर्व्हेक्षणाच्या आधारे उमेदवारीच्या चेहऱ्यांची निवड

## मॅझिक फिगर गाठण्यासाठी सोलापूर, पुणेसह पाच जिल्ह्यांवर मदार
## मोहिते-पाटील परिवारावर सोलापूर जिल्ह्याची धुरा

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात कैक दशकं स्वत:चं वेगळं अस्तित्व अन् वलय असलेल्या शरद पवार नामक ८४ वर्षीय तरुण योद्याचा करिष्मा पुढील महिन्याच्या मध्यावर होणाऱ्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीत दिसणार आहे. दुर्धर आजाराशी टक्कर देत राज्याच्या विकासाचं व्हिजन दाखविणारा या रणयोध्दा पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे महाराष्ट्रात निवडणूकीत फिरणार असून महाविकास आघाडीच्या झेंड्याखाली भले निवडणूक लढविण्याचा निर्णय झाला असला तरी स्वत:च्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार (तुतारी) गटाच्या जागा मित्र पक्षाच्या तुलनेत अधिकाधिक निवडणूक आणून मुख्यमंत्रीपदासाठी लागणारा मॅजिक







फिगर गाठण्यासाठी संघर्ष योध्दाचं 'मिशन विधानसभा' सुरु आहे.

विशेष म्हणजे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या सर्वाधिक जागा निवडणूक येण्यासाठी शरद पवार यांनी पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांवर मदार ठेऊन या जिल्ह्यात जोरकस फिल्डींग लावली आहे. निवडणूक येणाऱ्या चेहऱ्यांना उमेदवारी बहाल केली जाणार आहे. त्यासाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला राज्यातील ज्या मतदार संघामधील जागा द्यायच्या आहेत, त्या ठिकाणचे सर्व्हेक्षण करुन घेण्यात आले आहे. मॅजिक फिगर गाठण्याचा जो अंदाज आहे, तो बरोबर यावा, यासाठी संबंधित विधानसभेच्या मतदार संघात तीन सर्व्हे करुन घेण्यात आले असल्याची माहिती शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्याकडून दैनिक 'सुराज्य' ला माहिती मिळाली आहे. विधानसभा निवडणुकीत पक्षाला दगाफटका न बसता अधिकधिक जाग मिळण्याच्या दृष्टिने सर्वच आघाड्यांवर मायक्रो नियोजन शरद पवार यांच्याकडून केलं जात आहे. राज्यातील विधानसभेच्या २८८ मतदार संघांचा विस्तार पाहता 'या' 'त्या' जिल्ह्याची जबाबदारी पक्षाच्या संबंधित नेतेमंडळींवर सोपविण्याची तयारी केल्याची माहितीदेखील 'सुराज्य' मिळाली आहे. विशेषत्वे, सोलापूर जिल्ह्याची धुरा अकलूजकर मोहिते-पाटील यांच्यावर सोपविण्यात येत असल्याची माहितीदेखील 'सुराज्य'ला सुत्रांकडून मिळाली आहे.

### शरद अन् रोहित पवारांसह जयंत पाटलांचं सर्व्हेक्षण

विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जागांवर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचा विजयाचा गुलाल उधळण्याच्या पार्श्वभूमीवर, 'त्या' 'त्या' मतदार संघात उमेदवारीचा चेहरा देताना खूप काही निकष पाहिले जात आहेत. यासाठी शरद पवार, जयंत पाटील आणि रोहित पवार या तिघांनी तीन सर्व्हे करुन घेतले आहेत, त्या सर्व्हेंच्या आधारे निवडणून येण्याच्या कसोटीवर सक्षम असलेल्या चेहऱ्यास राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची उमेदवारी देण्यात येणार आहे, अशी माहिती सुत्रांकडून देण्यात आली.

### मुंबईसह कोकणला शिवसेना
### विदर्भ, मराठवाड्यात काँग्रेस उमेदवाऱ्या

राज्यातील विधानसभेच्या २८८ जागांचा विचार करता मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या पूर्वीपासून बालेकिल्ला असलेल्या शिवसेनेच्या साम्राज्याच्या ठिकाणी महाविकास आघाडीकडून अधिकाधिक जागा हे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला तर विदर्भ आणि मराठवाड्यात काँग्रेसला पश्चिम महाराष्ट्रात अधिकाधिक जागा राष्ट्रवादी शरचंद्र पवार पक्षाला सोडण्याचं विधानसभा जागा वाटपाचं सुत्र असणार आहे.

### सोलापूर जिल्ह्यावर पवारांची बारीक नजर,
### पण शिफारस लागणार मोहिते-पाटलांची

विधानसभेच्या राज्यात साधारण १२५ हून अधिक जागा लढविताना शरद पवारांचे लाडक्या सोलापूर जिल्ह्यावर लक्ष असणार आहे. पण या जिल्ह्याच्या कोणत्या तालुक्यातून कोणाला उमेदवारी द्यायची, मतदार आकृष्ठ करण्यासाठी कोणती रणनिती अवलंबायची यासह एकूण या जिल्ह्यातील विधानसभेच्या निवडणुकीसंबंधी महत्त्वाचे निर्णय घेण्याचे अधिकार अकलूजकर मोहिते-पाटील परिवाराला शरद पवारांनी दिल्याची माहिती समोर आली आहे.

### शनिवारपासून शरद पवार हे विदर्भ दौऱ्यावर

राष्ट्रवादी फोडून महाराष्ट्रात राजकीय भूकंप घडविला असला तरी 'बाप तो बाप रहेगा' हे दाखवून देण्याच्या पार्श्वभूमीवर, पर्यायाने राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची ताकद विधानसभेच्या निवडणुकीत दाखवून देण्यासाठी शरद पवार यांनी आपल्या शिलेदारांसह प्रयत्न चालू ठेवले आहेत. पुढील महिन्यात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने, तयारीचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार हे आजपासून म्हणजे ५ ऑक्टोबरपासून विदर्भ दौऱ्यावर जात आहेत.

### उमेदवारी देताना शरद पवारांनी 'हे' आखलं गणित

संबंधित विधानसभेच्या मतदार संघात कोणत्या जातीचे प्राबल्य मोठं आहे?, विधानसभेच्या मागील दोन टर्मला या मतदार संघात काय परिस्थिती राहिली? , संबधित विधानसभेच्या मतदार संघात कोणता फॅक्टर ठरेल प्रभावी? शरद पवार गटाची उमेदवारी देताना संबधित मतदार संघात व्यक्तीश: उमेदवारीच्या चेहऱ्याचा कितपत दिसेल प्रभाव, संबंधित मतदार संघात मराठा आणि धनगर समाजाच्या आरक्षणाचा निवडणुकीत किती होईल उठाव? या मतदार संघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची स्वत:च्या हक्काची व्होट बँक किती ?, संबंधित मतदार संघात विरोधी पक्ष किंवा विरोधी उमेदवार यांची ताकद किती?

---

विजापूर नाका पोलिसांची कामगिरी

## कर्नाटकातील आंतरराज्य टोळीला केले जेरबंद

**सोलापूर :** शहरातील हत्तुरे वस्ती ते पत्रकार भवन दरम्यान आंतराज्य सशस्त्र दरोड्याच्या तयारीतील सहाजणांच्या टोळीला विजापूर नाका पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्याकडून तीन लहान दरोड्याचे साहित्य, चारचाकी गाडीसह १३ लाख तीन हजार ८०० रुपयांचा ऐवज हस्तगत केला आहे.

ही कारवाई ३ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. या प्रकरणी विजापूर नाका पोलीस स्टेशन येथील पो.कॉ. अमृत सुरवसे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विशाल कृष्णप्पा बंडीवडार रा. हनगल, जि. हवेली, राज्य कर्नाटक) अनिल शिवप्पा वड्डर, प्रशांत उर्फ परश्या, कृष्णा उर्फ कृष्णाप्पा बंडीवडार, प्रवीण आणि अनंत (रा.चिनहळ्ळी) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे तपास स.पो.नि. गायकवाड हे करीत आहेत.

## इशादीन शेळकंदे यांच्या बदलीला अखेर स्थगिती

**सोलापूर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे यांच्या बदलीला अखेर मॅटमध्ये स्थगिती मिळाली आहे.



विधानसभा निवडणूका डोळ्यासमोर ठेवून निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राज्य शासनाने स्थानिक व नियुक्तीच्या ठिकाणी तीन वर्षे पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या सुरू केल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे यांची अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदी नियुक्ती झाली होती.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार करण्यात आलेल्या या अन्यायी व चुकीच्या नियुक्तीच्या विरोधात त्यांनी लागलीच मॅटमध्ये धाव घेतली होती. मॅट न्यायाधिकरणच्या निर्णयानुसार त्यांची शुक्रवारी अखेर बदली रद्द झाली. मात्र शेळकंदे यांनी सोलापूरचा पदभार सोडला होता. त्यामुळे ग्रामपंचायत विभागाचा पदभार सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे. इशादीन शेळकंदे यांच्या बदलीला स्थगिती मिळाल्याने ते पुन्हा लवकरच उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले.



बाळीवेस नवरात्र तरुण मंडळाने गजेंद्र मोक्ष देखावा सादर केला आहे.

## इंदापूर गोळीबार प्रकरणातील जखमीचा मृत्यू

**इंदापूर :** गोळीबार प्रकरणातील जखमी राहुल अशोक चव्हाण याचा शुक्रवारी सकाळी पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलीसांकडे केलेली तक्रार मागे घेण्याच्या कारणावरुन मागील सोमवारी सायंकाळी रात्री पावणेसात ते सात वाजण्याच्या दरम्यान इंदापूर महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोरच राहुल चव्हाण याच्यावर गोळीबार करण्यात आला होता. इंदापूर व अकलूज येथील खाजगी रुग्णालयात उपचार झाल्यानंतर पुढील उपचारासाठी राहुलला पुण्यात हलवले होते मणक्यामध्ये घुसलेल्या एका गोळीमुळे संसर्ग झाला.

## विजेच्या तारेचा स्पर्श होऊन तरुणाचा मृत्यू
### अडीच महिन्यात हिवरेच्या शिंदे कुटुंबावर काळाचा दुसरा घाला

**करमाळा/प्रतिनिधी**

शेतातील उसाला पाणी देण्यासाठी मोटर चालू करण्यासाठी जात असताना तुटलेल्या विजेच्या तारेचा गळ्याला स्पर्श होऊन हिवरे येथील तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शुक्रवारी सकाळी नऊच्या सुमारास ही घटना घडली आहे. हनुमंत तुकाराम शिंदे (वय-३५) असे त्या तरूणाचे नाव आहे. अडीच महिन्यांपूर्वी अज्ञात वाहनाने ठोकरल्याने हनुमंतच्या लहान भावाच्या मृत्यू झाला होता. लगेचच दुसऱ्या मोठ्या भावाचाही अशा प्रकारे अपघाती मृत्यू झाल्यामुळे हिवरे येथील शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



मृत : हनुमंत शिंदे

हिवरे गावात राहणारे हनुमंत हा शुक्रवारी सकाळी हिवरे शिवारातील पांडवडा भागात असलेल्या ऊस शेतीला पाणी देण्यासाठी मोटर चालू करण्यासाठी निघाले होते. उसातून जात असताना महावितरणच्या तुटून पडलेल्या उघड्या तारेचा त्याच्या गळ्याला स्पर्श झाला.शेतकऱ्यांना हनुमंत यांना तारेपासून सोडवून बेशुध्द अवस्थेत करमाळ्यातील डॉ. रोहन पाटील यांच्याकडे उपचारासाठी नेले. या ठिकाणी डॉक्टरांनी तपासून शिंदे यांना मृत घोषित केले. मृत हनुमंत यांच्या पाठीमागे वृद्ध आई-वडीलांसह पत्नी, दोन मुली, एक मुलगा, भावजय, एक पुतण्या असा परिवार आहे. घरातील दुसराही कर्ता पुरुष गेल्याने शिंदे कुटुंबावर अस्मानी संकट कोसळले असून हिवरे परिसरात शोककळा पसरली आहे. शुक्रवारी दुपारी चारच्या सुमारास हनुमंत यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नऊ रंगाच्या साड्याचे फंड कोणी काढलं गं ?

| कल्याण |
| --- |
| 116-85-159 |

| मुंबई |
| --- |
| 268-62-138 |

# माढ्याच्या राजकारणात वेगवान घडामोडी
## अभिजित पाटलांनी घेतली रोहित पवारांची भेट

### महाआघाडीकडून लढण्यास उत्सुक

**सोलापूर/प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे आमदार बबनराव शिंदे यांनी आपले चिरंजीव रणजितसिंह शिंदे यांना अपक्ष विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्याचा निर्णय घेतला. तर दुसरीकडे विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी आमदार रोहित पवार यांची भेट घेतली आहे. त्यामुळे माढा मतदारसंघात ट्विस्ट आला असून वेगवान घडामोडी घडत असल्याचे दिसत आहे.

माढ्याचे आमदार बबनराव शिंदे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून तिकिट न मिळाल्यास माझा मुलगा रणजितसिंह शिंदे हा माढ्यातून अपक्ष निवडणूक लढवेल, असे पंढरपूरमध्ये बोलताना स्पष्ट केले. त्यानंतर लोकसभा निवडणुकीत साथ सोडून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनानंतर भाजपच्या गोटात गेलेले विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी आमदार रोहित पवार यांची भेट घेतली आहे.



अरण : येथे अभिजित पाटील यांनी रोहित पवार यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.

त्यामुळे पाटील पुन्हा पवारांच्या राष्ट्रवादीच्या मार्गावर असल्याची चर्चा सुरू झाली आहे. फडणवीस यांनी विठ्ठल कारखान्याला राज्य सरकारच्या थकहमीनंतर ३४८ कोटी रूपयांचे एनसीडीसीचे कर्ज उपलब्ध करून दिले होते. असे असतानाही आता अभिजित पाटील यांनी घेतलेली रोहित पवारांची भेट फडणवीसांना धक्कादायक मानली जात आहे.

### ... तर तिरंगी लढत होणार

आ. बबनदादा शिंदे यांनी रणजितसिंहांना अपक्ष उभा करण्याचे जाहीर केले आहे. या निर्णयामुळे महायुतीला जोरदार धक्का बसलेला आहे. त्यामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून माढ्यात कोण उमेदवार असणार याची उत्सुकता लागली आहे. याशिवाय आता शरद पवार हे रणजितसिंह शिंदे यांना उमेदवारी देतात की नाही, याकडेही सर्वांचे लक्ष आहे. त्यांनी जर दुसरा उमेदवार दिला तर या मतदारसंघात तिरंगी लढत होणार आहे.

### शिंदेसेना उमेदवार देण्याची शक्यता; सावंतांची चर्चा

रणजितसिंह शिंदे अपक्ष उभारल्यास अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का आहे. अजितदादा यांच्याकडे रणजितसिंह शिंदेंशिवाय दुसरा तगडा उमेदवार नाही. त्यामुळे या मतदारसंघावर शिंदे सेना दावा करण्याची शक्यता आहे. भाजप आणि सेना यांच्या युतीमध्ये हा मतदारसंघ कायमस्वरूपी शिवसेनकडेच आहे. त्यामुळे आता शिंदे सेना प्रा. शिवाजी सावंत यांना उमेदवारी देण्याची शक्यता आहे. तशा चर्चा आता सुरू झाल्या आहेत.

## रणजितसिंह शिंदे अपक्ष लढणार




**पंढरपूर/प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीत माढा विधानसभा मतदार संघातून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारी न मिळाल्यास रणजितसिंह शिंदे अपक्ष लढणार आहेत, अशी माहिती आ. बबनदादा शिंदे यांनी दिली. हा एकप्रकारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा धक्का मानला जात आहे. माढा मतदारसंघांमध्ये मोहिते पाटील यांचे आव्हान नाही, असे आमदार बबनदादा शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्याबाबत आमदार शिंदे म्हणाले, निवडणूक डोळ्यासमोर ठेवून त्यांच्याकडून उसाचा दर दिला जात आहे. हा निवडणुकीचा स्टंट आहे. माढा विधानसभा मतदार संघातील पंढरपूर तालुक्यातील ४२ गावात अनेक विकास कामे केली आहेत यामुळे गेल्या पंधरा वर्षात केलेल्या विकास जोरावर मी मते मागणार आहे. विकासकामे जनता विसरणार नाही.रणजितसिंह शिंदे निवडणूक लढविणार आहेत. यामुळे मतदारांची त्यांना चांगली साथ मिळणार आहे. मी माझ्या मुलाकरिता शरद पवार यांच्याकडे उमेदवारीची मागणी केली आहे. जर तुतारी चिन्ह नाही मिळाले तर रणजित सिंह शिंदे हे माढा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### अजितदादांना धक्का

नुकतेच अजितदादांची जनसंवाद यात्रा माढा मतदारसंघात आली होती. त्यावेळी बबनदादा शिंदे यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले होते. त्याला आठवडाभराचा कालावधी होतोय तोवरच बबनदादांनी मोठी घोषणा केल्याने अजितदादांना मोठा धक्का बसला आहे.